# महिला व बालकल्याण विभाग

## जिल्हा परिषद, यवतमाळ

बस स्टँड जवळ, आर्णी रोड, यवतमाळ पिन-४४५००१

E-mail ID – icdszp_yavt@rediffmail.com दुरध्वनी क्रमांक ०७२३२-२४५३१८


क्रं.यजिप/एबाविसेयो/कक्ष/आस्था-२/ ५९८ /२०१८ दिनांक :- ~~जानेवारी, २०१८~~ 09/03/2018

## स्पर्धा परिक्षा

**तात्काळ / कालमर्यादा**

**प्रति,**

**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**प्रकल्प** - आर्णी / घाटंजी / मारेगाव / पांढरकवडा / राळेगाव / झरी

**विषय :-** **अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्र) स्थानिक अनुसूचित जमातीच्या अंगणवाडी सेविकेमधून पर्यवेक्षिका पदाकरीता स्पर्धा परिक्षेव्दारे (निवडीने) भरण्यासाठी पात्र अंगणवाडी सेविकामधुन अर्ज मागविण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रं.एबावि/२००१/प्र.क्रं.१४६/का-६,दिनांक १७ नोव्हेबर, २००१
२. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रं.एबावि/२००१/प्र.क्रं.१४६/का-६,दिनांक ०७ डीसेंबर, २००१
३. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रं.एबावि/२००१/प्र.क्रं.१४६/का-६,दिनांक २ जानेवारी,२००२
४. शासन शुध्दीपत्रक, क्र. डिएसआर २००९/प्र.क्र. ६१/आस्था-०५/दि. २५.०३.२०१०
५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं.:बीसीसी-२०१४/प्र.क्रं.२१३A/१४/१६-ब दि. ५ मार्च, २०१५
६. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:प्रानिमं १२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दि. ०५ जून, २०१४
७. शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रं.:बीसीसी-२०१४/प्र.क्रं.२१३A/१४/१६-ब दि. २६ जून, २०१५
८. शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र.एपिटी-२०१४/प्र.क्र.-१३९/आस्था-८, दि. ०५ जुलै,२०१४
९. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रं.मबाआ २०१७/प्र.क्रं.१८५/कार्या-७, दि. ३० जानेवारी, २०१८
१०. याचिका क्रमांक ६०५५/२०१४ प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई शाखा नागपुर यांचा आदेश दि. ०३.०३.२०१५
११. याचिका क्रमांक २०३७/२०१५ प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई शाखा नागपुर यांचा आदेश दि. ११.४.२०१६
१२. मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे अ.शा.पत्र क्र.आकाआ/साप्र/कावि-४२०/२०१७ दि. २१.१२.२०१७

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय परिपत्रक, न्यायालयीन आदेश व पत्राचे अनुषंगाने महिला व बाल कल्याण विभाग, जि.प. यवतमाळ पेसा क्षेत्राअंतर्गत स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या अंगणवाडी सेविकांमधुन स्पर्धा परीक्षेव्दारे (निवडीने) भरावयाच्या "अंगणवाडी पर्यवेक्षिका" (महिला) या पदाकरीता खाली नमुद केल्याप्रमाणे पात्र अंगणवाडी सेविकांमधून अर्ज मागविण्यात येत आहे. खालील अटी पुर्ण करीत असलेल्या यवतमाळ जिल्हात पेसा क्षेत्रात कार्यरत स्थानिक अनुसूचित जमातीच्या अंगणवाडी सेविका यांचेकडुन **विहीत नमुण्यांतील अर्ज दिनांक २८/०३/२०१८ पर्यंत आपले पर्यंत सादर करण्याबाबत सर्व अंगणवाडी सेविकांना आपले स्तरावरुन लेखी सूचित करावे** व पोच आपले दप्तरी ठेवावी. खालील अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या अंगणवाडी सेविकांचे अर्ज विहीत नमुन्यातच व संपुर्ण कागदपत्रासह दिनांक **०३/०४/२०१८** पर्यंत या कार्यालयास सादर करावे. दिनांक **०३/०४/२०१८** नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही. अंगणवाडी सेविकेने सादर केलेले संपुर्ण अर्ज विहीत कालावधी मध्येच या कार्यालयास सादर करावे. त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**पदभरतीचा तपशिल :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | प्रवर्ग | वेतन श्रेणी | लिंग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी पर्यवेक्षिका | ०४ | अनुसूचित जमाती (आर्णी, घाटंजी, मारेगाव, पांढरकवडा, राळेगाव व झरी तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक रहिवासी) | ९३०० -/३४८००- ग्रेड पे ४१००-/ | स्त्री |

**परिक्षेकरीता अंगणवाडी सेविकेची पात्रता, परीक्षेची कार्यपध्दती नियम व अटी खालीलप्रमाणे राहतील.**

१. ज्या अंगणवाडी सेविकेने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे व ज्या अंगणवाडी सेविकेची मानधनी सेवा १० वर्षे सेवा पुर्ण केलेली आहे, केवळ अशाच अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या अंगणवाडी सेविका परिक्षेकरीता पात्र राहतील.

२. महाराष्ट्र शासन, राजपत्र अधिसुचना दि. ०९.०६.२०१४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (Scheduled Area) अंगणवाडी पर्यवेक्षिका ही ग्रामस्तरावरची पदे अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुन भरण्यात येईल. सदर पदा करीता फक्त त्याच उमेदवारांनी अर्ज करणे आवश्यक आहे. इतर उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास ते अपात्र ठरविण्यात येईल. स्थानिक अनुसूचित जमाती उमेदवारांची व्याख्या सदर अधिसूचनेमध्ये देण्यात आलेली आहे ती या प्रमाणे - "जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई - वडील किंवा आजी - आजोबा संबंधित जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी, १९५० पासुन सातत्याने वास्तव करीत आहेत."

३. अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या नियुक्त्या मा. राज्यपाल महोदय यांनी निर्गमीत केलेल्या अधिसुचनेच्या अनुषंगाने करण्यात येतील तसेच स्थानिक अनुसूचित जामातीच्या पदा करीता नियुक्त होणारा उमेदवार अनुसूचीत क्षेत्राबाहेर बदलीस पात्र असणार नाही.

४. अंगणवाडी सेविकांच्या १० वर्षाच्या अनुभवासाठी बालवाडी सेविका/शिक्षीका/मदतनिस म्हणुन केलेली सेवाही विचारात घेतली जाईल. परंतु अर्ज करतांना अर्जदार अंगणवाडी सेविका या पदावर कार्यरत असणे आवश्यक आहे.

५. **लेखी परिक्षेचा दिनांक १५/०४/२०१८ रोजी वेळ दुपारी २ ते ३.३० हा आहे.** त्यामुळे त्यावेळेत परिक्षा घेण्यात येईल. काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेचा दिनांक व वेळेत बदल झाल्यास उमेदवारांना अगोदरच कळविण्यात येईल.

६. अर्जदार अंगणवाडी सेविकेचे वय लेखी परिक्षेचा दिनांक १५ एप्रिल २०१८ रोजी ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे. ५५ वर्षापेक्षा जास्त वय असल्यास त्यांचा अर्ज अपात्र करण्यात येईल.

७. अर्जासोबत दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, जन्मतारीख, शैक्षणिक पात्रता, अनुभव, वर नमुद अट क्र. २ नुसार सातत्याने वास्तव करीत असल्याबाबत आवश्यक पुरावा व जातीबाबतच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल.

८. दिनांक १५/०४२०१८ पर्यंत अटी व शर्ती पुर्ण करणा-या अनुसूचित जमाती प्रवर्गातील अंगणवाडी सेविकांकडूनच अर्ज मागवावे. स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गातुन अर्ज सादर केला आहे तसे आवेदन पत्रामध्ये स्पष्ट नमुद करावे.

९. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु. २५०/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे नावे अर्जासोबत सादर करावा लागेल. सदर शुल्क नापरतावा राहील. कोणत्याही परिस्थितीत ते परत केले जाणार नाही. धनाकर्ष नसलेले अर्ज अवैध ठरविण्यात येईल.

१०. पात्र सेविकांची मराठी २५ प्रश्न व ५० गुण, इंग्रजी २५ प्रश्न व ५० गुण, सामान्य ज्ञान २५ व प्रश्न ५० गुण व बुध्दीमापण व गणित २५ प्रश्न व ५० गुण याप्रमाणे एकुण १०० प्रश्नाची २०० गुणांसाठी परिक्षा एकच प्रश्नपत्रिका असलेली लेखी परिक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रीका वस्तूनिष्ठ स्वरुपाची बहुपर्यायी राहील.

११. आसन क्रमांक व परिक्षा केंद्राबाबत नंतर सुचना देण्यात येईल.

१२. प्रस्तुत परिक्षाचे केंद्र जिल्ह्याच्या ठिकाणी आयोजीत करण्यात येईल. परीक्षा केंद्रावर येण्या-जाण्याचा खर्च उमेदवाराला स्वत: करावा लागेल.

१३. लेखी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणाचे आधारे अंतिम निवड यादी शासनाच्या सेवाभरती विषयक नियमानुसार तयार करण्यात येईल. सदर निवड यादी एक वर्षाकरीता किंवा पुढील पदभरती प्रक्रिया यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत वैध राहील.

१४. अंगणवाडी सेविकामधून स्पर्धा परीक्षेव्दारे पर्यवेक्षिका या पदाकरीता वरील प्रमाणे अनुसूचित जमाती प्रवर्गातील जागा भरावयाचे असल्याने त्याच प्रवर्गातुन अर्ज मागविण्यात यावे.

१५. शासनाचे दिनांक ७.१२.२००६ चे परिपत्रकानुसार व वेळोवेळी निर्गमित परिपत्रकानुसार राखीव प्रवर्गातील उमेदवार नियुक्ती देतांना त्या प्रवर्गातील उमेदवारांना जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्याने जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती आदेश निर्गमित करता येणार नाही.

१६. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अनियो/१००५/१२६/सेवा-४ दि.३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परीभाषीक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे